# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक २५६०११५४,
२५६०११६०,
६५००३७००
६५००३७०१

गणेशखिंड, पुणे ४११००७

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०— २५६०११५४

संदर्भ क्र.: विकमं/२०११—१२/३८५ | दिनांक : ०५/११/२०११

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था/
विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग

**विषय**:— 'विद्यापीठे व महाविद्यालये तंबाखूमुक्त करण्याबाबत.......
**संदर्भ** : महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण/२०११/(प्र.२६१/११)/विशि—३,
दि. ०४/१०/२०११.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई—३२ यांचेकडून आलेले पत्र आपणांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवित आहोत.

कळावे, हि विनंती.

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

सोबत: महाराष्ट्र शासनाचे पत्र.

# महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र. संकीर्ण-२०११/(प्र.२६१ /११)/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक : ४ ऑक्टोबर, २०११

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठ,

विषय : विद्यापीठे व महाविद्यालये तंबाखूमुक्त करण्याबाबत

महोदय,

श्रीमती पद्मिनी सोमानी, संचालिका, सलाम मुंबई फांऊडेशन, मुंबई यांनी मा.मंत्री (उ.व तं.शि) यांना पाठविलेले दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजीचे निवेदनाची प्रत या पत्रासोबत आपणाकडे पाठवित आहे.

२. या प्रकरणी तातडीने आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावर करावी व त्यासंदर्भात विद्यापीठ परिसरामध्ये तंबाखूमुक्त वातावरण निर्मितीसाठी फलक व इतर माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये/तरुणांमध्ये जागृती येण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(प्र. गि. कानडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना तातडीच्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत माहितीसाठी :

२) श्रीमती पद्मिनी सोमानी, संचालिका,सलाम मुंबई फाऊंडेशन, ५/६, रेवा चेंबर्स, ३१, न्यु मरीन लाईन, मुंबई-४०००२०.

CR 260 11C:\Documents and Settings\Administrator\Desktop\Varsha\2011\CR 2011

क्र. मंत्री/उच्च व तंत्र शिक्षण/
सर्वसाधारण/ 3906 /२० दि.

१४ सप्टेंबर, २०११

VIMP

SALAAM MUMBAI FOUNDATION

प्रति,
मा. श्री. राजेश अंकुशराव टोपे,
उच्च आणि तंत्रज्ञान शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य

3906
16-9-11

PSec (H&TE)
Pl. put up immediately
14/9

(RAJESH TOPE)
Minister
Higher & Technical Education
Government of Maharashtra
Mantralaya, Mumbai 400 032

विषयः विद्यापीठे व महाविद्यालये तंबाखूमुक्त करण्याबाबत

माननीय महोदय,

तंबाखू ही अतिशय गहन समस्या असून, आपल्या देशात दररोज सुमारे २५०० व्यक्तींचा तंबाखूमुळे मृत्यू होत आहे. थसेच मुले आणि युवक हयांचे तंबाखूजन्य पदार्थ सेवनाचे प्रमाण वाढत आहे. भारतात प्रत्येक ३ सेकंदाला एक मूल/युवक पहिल्यांदा तंबाखू उत्पादनाचे सेवन करते.

वाढत्या तंबाखू सेवनाला आळा घालणे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तंबाखूच्या धोक्यापासून दूर राहावे हयाकरिता सलाम मुंबई फाउंडेशन महाराष्ट्रात विविध उपक्रमांद्वारे कार्य करीत आहे.

माननीय मंत्री महोदय आपल्याकडे उच्च आणि तंत्रज्ञान शिक्षण विभाग आहे. हया विभागाद्वारे नक्कीच युवकांना तंबाखू सेवनापासून दूर ठेवता येईल. हयाकरिता आपल्या विभागाने पुढील गोष्टींच्या पूर्ततेसाठी पाउले उचलली तर नक्की भविष्यात चित्र वेगळे दिसेल.

भारत सरकारने तंबाखू नियंत्रणासाठी सर्वंकष असा सिगरेट आणि अन्य तंबाखू उत्पादने कायदा, २००३ ची निर्मिती केलेली आहे परंतु त्याच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे. आपण पुढील अध्यादेश काढून कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांत करता येईल.

<u>अ) विद्यापीठे व महाविद्यालयांत तंबाखू नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी</u>

१. कलम ६ अनुसारः विद्यापीठे व महाविद्यालयांच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर एक फलक लावण्यात यावेत की सदर विद्यापीठ व महाविद्यालय तंबाखूमुक्त असून येथे तंबाखू सेवन व विक्रीस बंदी आहे.

२. विद्यापीठे व महाविद्यालयांच्या १०० यार्ड परिघात तंबाखू उत्पादने विक्रीस बंदी करणे.

३. कलम ४ अनुसारः विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये धूम्रपानास मज्जाव करणे.

5/6, Rewa Chambers,
31, New Marine Lines, Mumbai 400 020.
Tel.: (91-22) 6639 1500 / 2203 4808 Fax: (91-22) 2203 4809
E-mail : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

४. कलम ५ अनुसार: विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात कोणत्याही तंबाखू उत्पादनाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष जाहिराती स्वीकारण्यास मनाई.

आ) विद्यापीठे व महाविद्यालयांतील विविध अभ्यासक्रमात तंबाखू नियंत्रण माहितीचा समावेश

१. युवकांना तंबाखूच्या भीषण परिणामांची माहिती व्हावी हयासाठी विद्यापीठे व महाविद्यालयांतील विविध अभ्यासक्रमात तंबाखू नियंत्रण माहितीचा समावेश करता येईल; जसे की कायदा, मेडिकल, समाजकार्य, डी. एड. आणि बी. एड., वगैरे.

२. विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची तंबाखू नियंत्रण समिती बनवावी जे आपले विद्यापीठ व महाविद्यालय तंबाखूमुक्त करण्यास प्रयत्न करतील.

३. विद्यार्थ्यांनी फिल्डवर्क, सामाजिक संशोधन, प्रोजेक्टमध्ये तंबाखू ही समस्या हाताळावी हयासाठी प्रोत्साहन देणे.

माननीय मंत्री महोदयांना आम्ही विनंती करतो की आपण हया संदर्भात योग्य व सक्षम पावले उचलावीत; जेणेकरून भारताची नवी पिढी तंबाखूमुक्त होण्यास अधिक वेग येईल.

सहकार्याच्या अपेक्षेसह

पद्मिनी सोमानी

पद्मिनी सोमानी
संचालिका

# ! ! तंबाखू मुक्त शिक्षण संस्था परिसर अभियान ! !

दिनांक १४/११/२०११ ते २५/११/२०१२

## । प्रतिज्ञा ।

..................................................................

गुटखा, तंबाखू आणि धूम्रपान

हयांचे वाईट परिणाम मला माहिती आहेत.

शरीर, मन आणि समाज हयांना लागलेला

हा विनाशकारी रोग आहे.

मी, माझे मित्र, सहकारी

हया व्यसनांपासून दूर राहण्याची शपथ घेत आहोत.

देश, समाज, कुटुंबीय हयांच्या सुखाकरिता

मी तंबाखूचे सेवन करणार नाही.

मी आहे भारताचा नागरिक ...

मी आहे ज्ञानार्थी...

मी आहे निश्चयपूर्वक शपथ पाळणारा

आरोग्यपूजक !

..................................................................

**तंबाकू मतलब खल्लास**

**!! तंबाखू मुक्त शिक्षण संस्था परिसर अभियान !!**

दिनांक १४/११/२०११ ते २५/११/२०१२

## ! प्रतिज्ञा !

गुटखा,तंबाकू और धूम्रपान इसकी

बीमारीयों के बारें में मुझे जानकारी है ।

यह बीमारी शरीर, मन और समाज

के लिए हानिकारक है

हम, हमारे मित्र और हम सभी

इस व्यसन से दूर रहने की शपथ लेते हैं।

देश,समाज और परिवार के सुख के लिए

हम तंबाकू का सेवन नही करेंगे ।

हम भारत के नागरीक है...

हम ज्ञानार्थी है.....

हम इस शपथ का निश्चयपूर्वक पालन करेंगे ।

आरोग्यपूजक !

**तंबाकू मतलब खल्लास**

# Tobacco free education institutions campaign, Maharashtra.

## Pledge

I know the ill effects of gutkha, tobacco and Cigarette

This deadly disease has engulfed the body, mind and the society.

My friends and I take the pledge that we will stay away from this addiction.

I will not consume tobacco for the well being of my country, society and my family.

I am an Indian citizen.......

I am well informed........

I am determined to follow this oath!

**Tambaku Matlab Khallas.**